# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७२५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/११/२०१६

**१) आरोपीतांनी संगनमत करुन धाण्याच्या बो–यांची चोरी . :–**

दिनांक ३०/१०/२०१६ रोजी १७.०० ते ३१/१०/२०१६ रोजी ०७.०० वा. दर. यातील फिर्यादी हरदयाल माणव पटले वय ५६ वर्ष, रा. उसरला याने आपल्या शेतातील धानाचा चुरना करुन शेतात १००० जातीचे ३४ बोरे धान भरुन ठेवले होते यातील संशयीत आरोपीतांनी संगनमत करुन त्यापैकी २७ बोरे धान कि. ३२,७००/–रु. चा माल सुना मौका पाहुन चोरुन नेल्याचा संशय व्यक्त केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. म्हैसकर पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची आमोरासमोर धडक लागुन एकमेकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/११/२०१६ रोजी २३.०८ वा. दर. यातील आरोपी क्र. १ हा आपल्या मोटार सायकलने साकोली कडुन सानगडी कडे व आरोपी क्र.२ हा आपल्या मोटार सायकलने सानगडी कडुन साकोली कडे जात असता आपआपल्या वाहने भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन एकमेकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने आरोपी क्र.२ ची मेडीकल रिपोर्ट उपजिल्हा रूग्णालय साकोली येथुन आज दि. ३/११/२०१६ ला प्राप्त झाल्याने चौकशी अहवालावरून सरतर्फे फिर्यादी सफौ. मडावी यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे साकोली येथे कलम २७९,३३८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणाने दगडाने मारुन जखमी केले . :–**

दिनांक ०३/११/२०१६ रोजी १५.०० वा. दर. यातील फिर्यादी मोरेश्वर शंकर कोरे वय ५४ वर्ष, रा. कुंभली यांनी धानाचा चुर्णा झाल्याने शेतामध्ये कोंबडयाचा जेवनाच्या दरम्यान मित्रासोबत जात असतांना आरोपीला जेवना करीता बोलावले नाही म्हणुन आरोपीने भांडण करुन रोडावरील दगड उचलुन फिर्यादीच्या डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोस्टे साकोली येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) नॅनो चारचाकी वाहन चालकांने भरधाव वेगाने चालवुन मोटार सायकलला धडक दिल्याने, दोन जखमी . :–**

दिनांक ०२/११/२०१६ रोजी २०.०० वा. दर. यातील फिर्यादी गणेश तुलाराम वंजारी वय ३६ वर्ष, रा. गडेगाव यांचे वडील तुलाराम महादेव वंजारी वय ५७ वर्ष, रा. हे त्याचा मित्र संजय भोयर याचे मोटार सायकल वर गडेगााव कडुन लाखनी कडे जात असता एनएच ०६ रोड क्रास करीत असतांना भंडारा कडुन लाखनी कडे येणा–या अज्ञात आरोपी वाहन चालकाने आल्या ताब्यातील नॅनो चारचाकी वाहन भरधाव वेगाने व बेदरकारपणे चालवुन मोटार सायकलला धडक देवुन मोटार सायकल वरील दोन्ही इसमांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोस्टे लाखनी येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**५) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०३/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. मोहाडी, सिहोरा, गोबरवाही व साकोली येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ३४ लिटर हातभट्टी दारु कि. २,०००/–रु. चा तसेच १ लिटर ६२० मिली देशी कि. ४५० /–रु. असा एकुण कि. २,४५० माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५९०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.